जा. क्र. एशेपसं / प्रक्षेत्र/ २५३ / २०२३ दिनांक : १८.१२.२०२३

## निविदा सूचना

प्रति,

________________________

________________________

________________________

**विषय:-** एकात्मिक शेती पद्धती संशोधन येथे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कंत्राटी पद्त्तीने बह्यास्त्रोता मार्फत मनुष्यबळ (कुशल/ अकुशल) पुरविण्याकरीता दरपत्रक सादर करण्याबाबत.....

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने, सन २०२३-२४ करिता एकात्मिक शेती पद्धती संशोधन, अकोला कार्यालय अंतर्गत **खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात विविध पिकांचे प्रयोगाच, बिजोत्पादन कार्यक्रम व गाय / शेळीपालन / कुक्कुटपालन / मत्स्यपालन इत्यादी** घटक प्रक्षेत्रावर राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने प्रक्षेत्रावरील विविध कामे करण्याकरिता कंत्राटी पध्दतीने पुरुष / स्त्री मजूर लावण्या संबंधीचे दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर **दिनांक २६.१२.२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्या बाबत खुल्याबाजार पेठेतून दर मागविण्याचे प्रस्तावित आहे.

करिता खालील दिलेल्या प्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ | दर प्रती महिना (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | अकुशल कामगार ( पुरुष / स्त्री मजूर) | प्रती व्यक्ती | आठ तास | |
| २ | कुशल कामगार (पुरुष मजूर) | प्रती व्यक्ती | आठ तास | |

**अटी व शर्ती**

१) निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.० ते ५.० या वेळेस स्वीकारल्या जातील.

२) निविदा/ कोटेशन **मुख्य कृषीविद्यावेत्ता, एकात्मिक शेती पद्धती संशोधन, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला** यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.

३) कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे बंधन कारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधित इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४) कंत्राटदारास मिळालेल्या कामाच्या देयकाचे १० टक्के रक्कम सुरक्षा सुरक्षा ठेव म्हणून संबंधित विभागाकडे जमा करावी लागेल व काम पूर्ण झाल्यावर सुरक्षा ठेव परत मिळण्याकरिता संबंधित विभागाकडे अर्ज करावा लागेल, त्यानंतर सुरक्षा ठेव परत करण्यात येईल.

५) कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची व्यवस्था संबंधित निविदा धारकांनी करावी.

६) कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

७) एकात्मिक शेती पद्धती संशोधन कार्यालय व प्रक्षेत्रावरील असलेल्या संपूर्ण कामे करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशाशानाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

Officer In Charge, Agricultural Research System Cell, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 489
Dt. 18/12/2023

८) कंत्राटी पुरुष/स्त्री मजूर प्रक्षेत्रावर काम करीत असतांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

९) कंत्राटी पध्दतीने पुरुष/स्त्री मजूर लावतांना शासनाने घालून दिलेल्या शासन निर्णय अटी व नियमांचे तंतोतंत पालन संबंधित निविदा धारकांना करावा लागेल.

१०) प्रक्षेत्रावर कोणतेही वाद विवाद निर्माण झाल्यास कोट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी / मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांचा राहील व तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

११) प्रक्षेत्रावर/कार्यालयात देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत प्रक्षेत्रावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

१२) कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निदेर्शित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील.

१३) प्रक्षेत्रावरील प्रयोग/बिजोत्पादन व अन्य घटक संबंधित कामे हि एक वर्ष मधील खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामाकरिता असून कामाचे दर एका वर्ष करिता वैध राहतील.

१४) कंत्राटी दाराने निविदा सादर करताना संस्थेचे नोंदणी पत्र, भविष्य निर्वाह निधी पत्र, विमा सुरक्षा पत्र, मागील तिन वर्षाचे जी. एस. टी. भरणा केल्याचे पत्र, पेनकार्ड व आयकर विवरण पत्र या दस्तऐवजसह सिलबंद देण्यात यावे.

१५) मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/ कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचाऱ्यांना किमान वेतन, विमा संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेस पध्दतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या रु.१००/- स्टंप पेपर वर करारनामा मध्ये देण्यात यावा.

१६) मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांना देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावी.

१७) निविदा सूचनांची छायांकित प्रत काढून निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१८) निविदा प्रक्रियेतील निविदा मंजूर करण्याचे अधिकार पूर्णतः **मुख्य कृषीविद्यावेत्ता, एकात्मिक शेती पद्धती संशोधन, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला** कार्यालयाने राखून ठेवलेले आहे व ती अट निविधा धारकास बंधनकारक राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविदा धारकांनीच नमूद कामाचे दरपत्रक सादर करावे.

आपदेशमुख

**मुख्य कृषीविद्यावेत्ता**
**एकात्मिक शेती पद्धती संशोधन,**
**डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला.**

**प्रतिलिपी:**

प्रभारी अधिकारी (ARIS Cell), डॉ, पं. दे. कृ. वि., अकोला यांना सादर निविधा विद्यापीठ संकेतस्थळावर उपलोड करण्याकरिता अग्रेषित.